नोंदणी क्रमांक : MAHMAR/2021/82132 | पाने : ४ | वर्ष : ४थे | अंक : १३८ | किंमत : ४ रूपये

Gmail : aklgavakari@gmail.com
Gmail : punegavkari@gmail.com




# महाराष्ट्राचे सर्वमान्य दैनिक समर्थ गांवकरी

संपादक : डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे
POSTAL REGISTRATION NO : SRP/137/2023-2026




शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६

मुंबई, अहमदनगर, पुणे, नाशिक, जळगाव, धुळे, नंदुरबार, सिंधुदुर्ग, रत्नागिरी, पालघर, सांगली, सातारा, कोल्हापूर, सोलापूर, औरंगाबाद, बीड, नांदेड, परभणी, हिंगोली, लातूर, बुलढाणा, अमरावती, अकोला, नागपूर, गडचिरोली, भंडारा, गोंदिया, यवतमाळ, वर्धा, येथून एकाच वेळी प्रकाशित होणारे दैनिक

## थोडक्यात...

### अहिल्यानगर जिल्ह्यातील शाळांच्या वेळेत बदल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : उन्हाचा कहर वाढू लागल्याने विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा विचार करून जिल्ह्यातील सर्व माध्यमांच्या शाळांच्या वेळेत बदल करण्यात आला आहे. उद्या, शनिवारपासून ते उन्हाळ्याची सुट्टी लागेपर्यंत शाळा सकाळी ७ ते ११ या वेळेत भरतील, असा आदेश जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष डॉ. पंकज आशिया यांनी दिला आहे. दरम्यान भारतीय हवामान खात्याने आज, शुक्रवारी जिल्ह्यासाठी उष्णतेच्या लाटेचा 'येलो 'ॲलर्ट' जारी केला होता. त्यानंतर उष्माघातचे दुष्परिणाम टाळण्यासाठी खबरदारीचा उपाय म्हणून शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेण्यात आला. आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ अंतर्गत जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी शाळांच्या वेळा बदलाचा आदेश दिला आहे. शाळांनी व्यवस्थापन समितीची मंजुरी घेऊन अंमलबजावणी करावी असेही निर्देश त्यांनी दिले आहेत. संबंधित निर्णयाची माहिती सर्व मुख्याध्यापकांपर्यंत पोहोचवण्याची सूचना त्यांनी शिक्षण विभागाला केली आहे. शिक्षकांनी परीक्षेचे कामकाज पूर्ण करण्यासाठी सकाळी ७ ते दुपारी १२ या वेळेत शाळेत उपस्थित राहावे असेही त्यांनी निर्देश दिले आहेत.

### रॉकेल वितरण बंद होणार नाही!

अहिल्यानगर (स. गांवकरी) : युद्धामुळे निर्माण झालेली जागतिक परिस्थिती लक्षात घेऊन महाराष्ट्रातील इंधनाच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी यापुढेही रॉकेल वितरण कायमस्वरूपी ठेवले जाणार आहे. राज्यासाठी ३.५ हजार किलोलीटर रॉकेल कोटा उपलब्ध आहे. वितरणात काही अडचणी आहेत, मात्र रॉकेल वितरण बंद केले जाणार नाही, असे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी सांगितले. मंत्री भुजबळ आज, शुक्रवारी दुपारी अहिल्यानगर शहरात थांबले होते. त्यावेळी ते पत्रकारांशी बोलत होते. भुजबळ यांनी सांगितले की, युद्धामुळे जागतिक पातळीवर इंधनाचे प्रश्न निर्माण झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी देशाला अधिक इंधन उपलब्ध व्हावे यासाठी प्रयत्न करत आहेत. परंतु इतर देशांसारखी आपल्याकडे गंभीर परिस्थिती नाही. न्यायालयाच्या संदर्भाने राज्यात रॉकेल वितरण थांबवले होते. मात्र आता न्यायालयाच्याच परवानगीने सद्य परिस्थितीत रॉकेल वितरण सुरू करण्यात आले आहे.

### शिक्षण विभागाने घेतला मोठा निर्णय!

पुणे(स. गांवकरी) : राज्यातील सर्व माध्यमांच्या खासगी प्राथमिक आणि माध्यमिक शाळांना गणवेश आणि इतर शैक्षणिक साहित्याची खरेदी विशिष्ट दुकानांतून, शाळेतून खरेदी करण्याबाबत केल्या जाणाऱ्या सक्तीला शिक्षण विभागाने चाप लावला आहे. अशा प्रकारची सक्ती शाळांना करता येणार नसल्याचे शिक्षण विभागाकडून स्पष्ट करण्यात आले असून, या बाबत तक्रारी आल्यास शिक्षणाधिकारी, प्रशासन अधिकारी यांनी शहानिशा करून त्यात तथ्य आढळल्यास संबंधित शाळेवर कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. प्राथमिक शिक्षण संचालक शरद गोसावी, माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण संचालक डॉ. महेश पालकर यांनी या बाबत संयुक्त परिपत्रक प्रसिद्ध केले आहे. शाळेचा गणवेश आणि इतर शैक्षणिक साहित्य विशिष्ट दुकानातून किंवा शाळेतूनच खरेदी करण्याची सक्ती न करण्याबाबत प्राथमिक शिक्षण संचालनालयाने २६ ऑगस्ट २०२४ रोजी परिपत्रकाद्वारे सूचना देण्यात आल्या होत्या.

### राज्यातील १७ लाख कर्मचारी - शिक्षक जाणार संपावर; शासनाविरोधात तीव्र नाराजी

# २१ एप्रिलपासून बेमुदत संप

मुंबई : (स. गांवकरी)

राज्यातील सरकारी, निमसरकारी कर्मचारी, तसेच शिक्षक - शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी आपल्या प्रलंबित मागण्यांसाठी आता थेट संघर्षाचा मार्ग अवलंबण्याचा निर्णय घेतला असून २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाण्याचा इशारा दिला आहे.

राज्यातील सुमारे १७ लाख कर्मचारी - शिक्षक गेल्या १५ महिन्यांपासून शासनाच्या कारभारावर नाराज आहेत. प्रलंबित मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष करण्यात येत असल्याचा आरोप हे कर्मचारी करीत आहेत. गेल्या वर्षभरात विविध संघटनांनी सात वेळा आंदोलन करूनही शासनाने ठोस भूमिका घेतली नसल्याने अखेर संपाचा निर्णय घेतल्याचे महाराष्ट्र समन्वय समितीचे निमंत्रक विश्वास काटकर यांनी सांगितले.

कर्मचारी संघटनांनी मांडलेल्या प्रमुख मागण्यांमध्ये सुधारित राष्ट्रीय निवृत्ती वेतन योजनेबाबत स्पष्ट नियम जाहीर करणे, १ मार्च २०२४ पासून निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांना तात्पुरते निवृत्ती वेतन देणे, तसेच सेवांतर्गत आश्वासित प्रगती योजनेअंतर्गत (१०:२०:३०) लाभ द्यावा आदींचा समावेश आहे. याशिवाय, निवृत्तीचे वय ६० वर्षे करण्याची मागणीही पुन्हा जोर धरत आहे. देशातील बहुतेक राज्यांमध्ये हा निर्णय लागू झाल्याचा दाखला देत महाराष्ट्रातही तो लागू करावा, अशी मागणी कर्मचारी संघटनांनी केली आहे.

राज्यातील शासकीय विभागांमध्ये सुमारे ३५ टक्के पदे रिक्त असल्यामुळे कामाचा अतिरिक्त ताण वाढत असल्याचेही निदर्शनास आणण्यात आले आहे. तसेच, चतुर्थश्रेणी व वाहनचालकांच्या भरतीवर घातलेली बंदी, कंत्राटी कर्मचाऱ्यांचे नियमितीकरण, तसेच सर्व कर्मचाऱ्यांसाठी व्यापक रोकडविरहित (कॅशलेस) आरोग्य विमा योजना लागू करण्याच्या मागण्या प्राधान्याने मांडण्यात आल्या आहेत.

जुनी निवृत्ती वेतन योजना लागू करणे, नगरपालिका व नगरपरिषदांतील कर्मचाऱ्यांच्या आकृतीबंधाचा प्रश्न सोडवणे, तसेच दीर्घकाळ कंत्राटी पद्धतीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना नियमित सेवेत घेणे या मुद्द्यांवरही शासनाने तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.




### शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालयांवर परिणाम होणार

एकूण १८ प्रलंबित मागण्यांकडे शासन जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याची भावना कर्मचाऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. त्यामुळे राज्यभरातील कर्मचारी - शिक्षक २१ एप्रिलपासून बेमुदत संपावर जाणार असल्याने प्रशासनासमोर मोठे आव्हान उभे राहण्याची शक्यता आहे. दरम्यान, या संपाचा परिणाम शासकीय कार्यालये, शाळा, महाविद्यालये, तसेच विविध सार्वजनिक सेवांवर होण्याची शक्यता असून, शासनाने तातडीने हस्तक्षेप करून तोडगा काढावा, अशी मागणी होत आहे.

## महिला आरक्षण विधेयक पडले

*पाठोपाठ 'परिसीमन' सह इतर दोन बिलेही सरकारने घेतली मागे*

नवी दिल्ली : (स. गांवकरी)



२०२९ च्या लोकसभा निवडणुकांसाठी लोकसभेच्या जागा वाढवून महिलांना ३३ टक्के आरक्षण देण्याचे केंद्र सरकारचे स्वप्न सध्या तरी धुसर झाले आहे. लोकसभेत शुक्रवारी झालेल्या मतदानादरम्यान 'संविधान (१३१ वे) दुरुस्ती विधेयक २०२६' आवश्यक असलेल्या दोन-तृतीयांश बहुमताअभावी मंजूर होऊ शकले नाही. या ऐतिहासिक पराभवानंतर सरकारने या विधेयकाशी संबंधित असलेले इतर दोन महत्त्वाचे कायदेही मागे घेण्याचा निर्णय घेतला आहे.

लोकसभेत या विधेयकावर मतदान झाले तेव्हा विधेयकाच्या बाजूने २९८ मते तर विधेयकाच्या विरोधात २३० मते पडली. घटनादुरुस्तीसाठी किमान ३५२ (२/३) मतांची गरज होती. सरकारला बहुमतासाठी ५४ मते कमी पडल्याने हे विधेयक फेटाळले गेले. या मुख्य विधेयकासोबतच सरकारने 'परिसीमन विधेयक, २०२६' आणि 'संघ राज्य विधी (संशोधन) विधेयक, २०२६' देखील चर्चेसाठी ठेवले होते. मात्र, मुख्य घटनादुरुस्ती विधेयकच पडल्यामुळे संसदीय कार्यमंत्री किरण रिजिजू यांनी घोषणा केली की, सरकार आता ही दोन्ही उर्वरित बिले पुढे नेणार नाही. रिजिजू म्हणाले, "विरोधकांनी महिलांना सन्मान देण्याची मोठी संधी गमावली आहे. मुख्य संविधान दुरुस्ती विधेयकच बहुमताने मंजूर होऊ शकले नसल्याने, त्याशी संबंधित इतर दोन विधेयकांवर चर्चा करण्याचा प्रश्नच उरत नाही." या पराभवानंतर गृहमंत्री अमित शाह यांनी संताप व्यक्त केला असून, काँग्रेससह 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांनी महिलांचा अधिकार हिरावून घेतल्याचा आरोप केला आहे. "हा नारी शक्तीचा अपमान असून याचे परिणाम विरोधकांना आगामी निवडणुकीत भोगावे लागतील," असा इशारा त्यांनी दिला आहे. आज लोकसभेत एक अतिशय विचित्र दृश्य दिसले. नारी शक्ती वंदन अधिनियमासाठी आवश्यक असलेले संविधान दुरुस्ती विधेयक काँग्रेस, टीएमसी, डीएमके आणि समाजवादी पक्षाने मंजूर होऊ दिले नाही. महिलांच्या हक्काचे विधेयक पाडून त्याचा जल्लोष करणे हे अत्यंत निंदनीय आणि कल्पनेपलीकडचे आहे. आता देशातील महिलांना लोकसभा आणि विधानसभेत ३३% आरक्षण मिळू शकणार नाही, जो त्यांचा हक्क होता. काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षांनी हे पहिल्यांदाच केलेले नाही, तर ते वारंवार असेच वागत आले आहेत.

## कोल्हापूर - सांगलीतील पूर नियंत्रण होणार हवामान बदलाशी सुसंगत

मुंबई : (स. गांवकरी)



कोल्हापूर आणि सांगली जिल्ह्यात उद्भवणाऱ्या पूर स्थितीवर कायमस्वरूपी उपाययोजना करण्यासाठी राज्य सरकारने महाराष्ट्र प्रतिसादक्षम विकास कार्यक्रम (एमआरडीपी) अंतर्गत नव्या बाबींना मान्यता दिली आहे. जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने राबवल्या जाणाऱ्या या प्रकल्पात आता हवामान अनुकूल पायाभूत सुविधा आणि आपत्ती विमा संरक्षणाचाही समावेश करण्यात आला आहे. कोल्हापूर, सांगली, मिरज, कुपवाड आणि इचलकरंजी या शहरांसाठी एमआरडीपी कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या प्रकल्पांतर्गत आता जलसाठा संरचनांचे (धरण) नूतनीकरण, नवीन पूर निवारण संरचना बांधणे आणि हवामान बदलाशी सुसंगत अभियांत्रिकी प्रारुपे तयार करण्यास मान्यता देण्यात आली आहे. महाराष्ट्र जलसंधारण महामंडळ आणि मित्रा संस्थेमध्ये स्वतंत्र प्रकल्प अंमलबजावणी कक्ष स्थापन केले जाणार आहेत. आपत्ती निवारणासाठी खासगी भांडवल आकर्षित करण्यासाठी महाराष्ट्र प्रतिसादक्षम वित्त कार्यक्रम राबवला जाईल. यासाठी १.९० लाख डॉलरचा निधी मंजूर करण्यात आला असून, त्यापैकी १.६० डॉलर विमा प्रीमियम व कर्ज सवलतीसाठी वापरला जाणार आहे.

प्रकल्पाच्या संनियंत्रणासाठी आपत्ती व्यवस्थापन मंत्री आणि जलसंपदा मंत्री यांच्या संयुक्त अध्यक्षतेखाली 'प्रकल्प मूल्यांकन समिती' गठित करण्यात आली आहे. ही समिती दर दोन महिन्यांनी कामाचा आढावा घेणार आहे.

## अयान म्हणतो, तो चार भिंतीतला ॲक्ट 'विथ हर कन्सेंट'

### सोशल मीडियातून हेरले सावज; तो 'फ्लॅट' ऐय्याशीचा हॉटस्पॉट

अमरावती : (स. गांवकरी)

शांत आणि सुसंस्कृत समजल्या जाणाऱ्या जिल्ह्याला हादरवून सोडणारे 'व्हिडिओ कांड' आता अधिक गडद होत चालले आहे. परतवाड्याचा मुख्य नराधम अयान अहमद याने केवळ मुलींचे आयुष्यच बरबाद केले नाही, तर अमरावतीच्या कठोरा नाका परिसरातील एका भाड्याच्या फ्लॅटला आपल्या पाशवी वासनेचा अड्डा बनवल्याचे पोलिस तपासात उघड झाले आहे. कठोरा रोडवरील 'तो' फ्लॅट आता या प्रकरणाचा मुख्य 'हॉटस्पॉट' ठरला असून, त्याठिकाणी चालणाऱ्या कुकृत्याची भीषणता पाहून तपास यंत्रणाही चक्रावून गेली आहे. एसआयटीने गुरुवारी कठोरा नाका रोडवरील त्या फ्लॅटमध्ये जाऊन क्राईम सीन रिक्रिएट केला. धक्कादायक बाब म्हणजे, मानव सुगंधे या आरोपीने स्वतःच्या नावाने हा फ्लॅट भाड्याने घेतला होता आणि तो अयान अहमदला 'तासिका तत्त्वावर' मुलींचे लैंगिक शोषण करण्यासाठी पुरवत होता. या प्रकरणात आता फ्लॅट मालकाचीही कसून चौकशी केली जाणार असून, अमरावतीच्या गजबजलेल्या वस्तीत हे 'सेक्स रॅकेट' कोणाच्या आशीर्वादाने चालत होते? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पोलिस त्या अंगानेही चौकशी करत आहेत. पोलिसांकडून जप्त मोबाईलमध्ये आतापर्यंत आठ पीडित मुलींचे १८ अश्लील व्हिडिओ आणि ३९ फोटो सापडले आहेत. यातील काही मुली अल्पवयीन असण्याची दाट शक्यता असल्याने पोलिसांनी पोक्सोअंतर्गत गुन्हा दाखल केला आहे. यात एका विशिष्ट धर्माच्या मुलींनाच लक्ष्य केल्याच्या अल्पसंख्याक आयोगाच्या अध्यक्षांच्या दाव्यानंतर एसपी विशाल आनंद यांनीही ते मान्य केले. पोलिसांनी आरोपींकडून मोबाईलसह लॅपटॉप, टॅब आणि हार्ड डिस्क जप्त केली असून, ती फॉरेन्सिक लॅबला पाठवण्यात आली आहे. डिलीट केलेल डेटा रिकव्हर झाल्यास पीडितांचा आकडा आणि आरोपींची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.




### मानव असा बनला राक्षस

आर्वी येथील मानव हा येथे बीबीए करत आहे. पीयूष नामक तरुणदेखील यापूर्वी तो फ्लॅट अशाच कामासाठी उपलब्ध करून द्यायचा. त्यानंतर त्याने अमरावती सोडले. पीयूषच्या ओळखीतील व्यक्तीने अयानला मानव त्याचा भाड्याचा फ्लॅट तासाप्रमाणे देतो, असे सूचविले. त्यानंतर अयान याने मानवशी संपर्क साधला. त्यानंतर तेथे एक हजार रुपये प्रति तासाप्रमाणे विकृतीचा खेळ सुरू झाला.

# पोटनिवडणुकीच्या प्रचारात भोंदू प्रकरण

### खरातशी संबंध असल्याचे आजी-माजी खासदारांचे आरोप-प्रत्यारोप...



अहिल्यानगर : (स. गांवकरी)

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीच्या प्रचारात फारसा धुराळा आत्तापर्यंत निर्माण झाला नसला तरी आता 'भोंदू अशोक खरात'चे प्रकरण प्रचारात आले आहे. या प्रकरणावरून भाजपचे माजी खासदार सुजय विखे व राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) खासदार नीलेश लंके यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत दोन्ही बाजूंकडून परस्परांचे नाव न घेता एकमेकांचे 'भोंदू अशोक खरात'शी कसे संबंध आहेत, याचे वाभाडे काढले जाऊ लागले आहेत. राहुरी पोटनिवडणुकीत भाजपचे अक्षय कर्डिले व राष्ट्रवादीचे गोविंद मोकाटे यांच्यामध्ये प्रमुख लढत होत आहे. उन्हाचे प्रचंड प्रमाण, पोटनिवडणुकीतील उदासीन वातावरण यामुळे प्रचाराला मर्यादा आल्या आहेत. सुरुवातीच्या टप्प्यात दोन्ही बाजूंकडून भेटीगाठी, गावसभा यावर भर दिला जात होता. कर्डिले यांच्या प्रचाराची प्रमुख धुरा सुजय विखे यांनी उचलली आहे तर राष्ट्रवादीचे खासदार लंके सुरुवातीच्या टप्प्यात प्रचारात फारसे सक्रिय नव्हते मात्र त्यांनी आता मतदारसंघात सभा घेण्यास सुरुवात केली आहे. अशोक खरात प्रकरणास सुरुवात झाली त्यावेळी त्यांच्या समवेतचे खासदार लंके यांचे छायाचित्र प्रसारमाध्यमावर प्रसारित झाले होते. तो संदर्भ देत माजी खासदार विखे यांनी लंके यांच्यावर आरोप केले. विखे म्हणाले, गेली ४० वर्षे जिल्ह्याच्या राजकारणात सक्रिय असूनही आमच्या कुटुंबांपैकी कोणी खरातशी संबंधित नाही. परंतु अलीकडेच निवडून आलेले खरात, सिस्पे घोटाळा, यामध्ये दिसू लागली आहेत. विखे यांनी प्रचारसभेतून आणि प्रसारमाध्यमांशी बोलताना खरात प्रकरणावरून लंके यांच्यावर आरोप केले. त्याला आता खासदार लंके यांनी जोरदार प्रत्युत्तर देत सुजय विखे यांच्या नातलगाचा खरात समवेतचे छायाचित्र प्रसिद्ध केले आहे. विखे यांच्यावर पलटवार करताना लंके म्हणाले, कोणतीही सभा असो, निवडणूक असो किंवा धार्मिक कार्यक्रम असो, आमच्यावर टीका केल्याशिवाय त्यांचे काही होत नाही.

## महाराष्ट्र नक्षलवादमुक्त करणाऱ्या जवानांचा पदकाने सन्मान

मुंबई : (स. गांवकरी)



राज्यातील विशेषतः गडचिरोली आणि गोंदिया जिल्हयातील नक्षलवाद मोडून काढण्यासाठी आपल्या प्राणाची बाजी लावणाऱ्या विशेष अभियान पथकातील (सी-६०) जवानांचा पदकाने सन्मान करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. त्यानुसार येत्या महाराष्ट्र दिनी ५०० जवानांना पदकाने सन्मानीत करण्यात येणार आहे. राज्यातील सशस्त्र माओवादी कारवायांना प्रभावीपणे रोखण्याकरिता सरकारने डिसेंबर १९९०मध्ये विशेष अभियान पथकाची (सी-६०) स्थापना केली होती. प्रारंभी या पथकात ६० जवान कार्यरत होते. सध्या गडचिरोली जिल्ह्यात २९ पथके व गोंदिया जिल्ह्यात ९ पथके कार्यरत असून, गडचिरोली येथील प्रत्येक पथकामध्ये २८ जवान व गोंदिया येथील प्रत्येक पथकामध्ये २० जवान कार्यरत आहेत. केंद्र सरकारने सुधारित वर्गीकरणानुसार गडचिरोली व गोंदिया या माओवादी,नक्षलवादी कारवायांनी प्रभावित जिल्ह्यांचा वारसा आणि प्राधान्य या श्रेणीत समावेश केला आहे. लक्षलग्रस्त भागात प्रभावी कामगिरी करणाऱ्या सी-६० पथकातील जवानांना पदक देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काही दिवसांपूर्वी केली होती. त्यानुसार गृह विभागाने आज याबाबतचा शासन निर्णय निर्गमित केला असून या विशेष पथकातील कर्मचाऱ्यांना तांब्याचे पथक देऊन महाराष्ट्र दिनी सन्मानित केले जाणार आहे. राज्य सरकारकडून दहशतवादी कारवाया प्रतिबंधक पथक अर्थात फोर्स वन दलामध्ये सलग दोन वर्षे सेवा करणाऱ्या कमांडो अधिकारी,अंमलदारांना विशेष सेवा पदक प्रदान करण्यात येते. तसेच, जलद प्रतिसाद पथकामध्ये मध्ये सलग दोन वर्षे सेवा करणाऱ्या अधिकाऱ्यांना व चार वर्षे सेवा करणाऱ्या कर्मचाऱ्यांना विशेष सेवा पदक व प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येते. त्याच धर्तीवर आता सशस्त्र माओवादी कारवायांना प्रभावीपणे रोखणा-या तसेच नक्षलवादाविरोधात अत्यंत कठीण परिस्थितीत कार्यरत असलेल्या विशेष अभियान पथक (सी-६०) मधील पोलीस अधिकारी, अंमलदार यांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांच्या गुणवत्तापूर्ण सेवेची शासनस्तरावर दखल घेण्यासाठी सी-६० सेवा पदक देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सांगलीत मनीष केत यांचा सत्कार; डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते गौरव!

सांगली (स. गांवकरी) : सोलापूर महानगरपालिकेच्या स्वीकृत नगरसेवकपदी निवड झाल्याबद्दल मनीष केत यांचा सांगली येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी मनीष केत यांना पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. त्यांच्या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. यावेळी ABP माझा च्या संपादिका सरीता कौशिक, भाजपाचे मुख्य प्रवक्ते तथा मुंबई महानगरपालिकेचे नगरसेवक पत्रकार नवनाथ बण, अशोक देढे तसेच संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहात पार पडला.



### बांधकाम साहित्याच्या दरवाढीबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे निवेदन

डांग,गुजरात (स. गांवकरी) : डांग जिल्हा कंट्रक्शन चे काम करणार संघटनेने जिल्हाधिकाऱ्यांना संबोधित करून एक निवेदन सादर केले आहे. सध्याच्या जागतिक परिस्थितीमुळे, विशेषतः खाडी युद्धाच्या परिणामस्वरूप, बांधकाम साहित्याच्या दरांमध्ये अचानक आणि मोठी वाढ झाल्याने कंत्राटदारांना तात्काळ दिलासा देण्याची मागणी करण्यात आली आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, राज्यातील विविध विभागांकडून निघालेल्या टेंडरनुसार कंट्रक्शनदार "कंत्राटदार" रस्ते, पूल, धरणे, कालवे, पाइपलाइन, इमारती, विमानतळ, रुग्णालये तसेच विद्युत सुविधा यांसारखी अनेक विकासकामे करत आहेत. टेंडर भरताना त्या वेळच्या बाजारभाव, S.O.R. (Schedule of Rates) आणि वाहतूक खर्च यांच्या आधारे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. मात्र, सध्याच्या परिस्थितीत बिटुमिन, सिमेंट, स्टील, डिझेल, पेट्रोल, क्रशर धूळ, एग्रीगेट तसेच इलेक्ट्रिकल साहित्य यांच्या दरात मोठी वाढ झाली आहे. यासोबतच वाहतूक खर्चातही लक्षणीय वाढ झाल्याने पूर्वीचे सर्व आर्थिक अंदाज कोलमडले असून कंत्राटदारांना मोठे नुकसान सहन करावे लागत आहे.



### २५ गावांचा उत्स्फूर्त सहभाग; सामाजिक ऐक्याचा संदेश

भिवंडी (स. गांवकरी) : भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरात क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले आणि विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त भव्य महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. मंगळवार, दिनांक १४ एप्रिल २०२६ रोजी पार पडलेल्या या उत्सवात पडघा परिसरातील तब्बल २५ गावांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत सामाजिक ऐक्याचे दर्शन घडविले. पडघा येथील जिल्हा परिषद मराठी केंद्र शाळेत सकाळी १०.३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. शिवसेना नेते प्रकाश पाटील यांच्या हस्ते कार्यक्रमाचे उद्घाटन झाले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी महामानवांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. बुद्ध वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात झाली. तसेच मान्यवरांचे स्वागत महामानवांच्या विचारांचे पुस्तक देऊन करण्यात आले. प्रबोधन सत्रात शाहीर आकाश पवार यांनी "आम्ही भारताचे लोक आणि भारतीय संविधान" या विषयावर प्रभावी मार्गदर्शन केले. त्यांनी संविधानाचे महत्त्व साध्या आणि सोप्या भाषेत मांडत नागरिकांना आपल्या अधिकार आणि कर्तव्यांची जाणीव करून दिली. सायंकाळी ७ वाजता समतानगर बुद्ध विहार येथून जिल्हा परिषद मराठी शाळा, पडघा पर्यंत भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत महात्मा फुले आणि डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमा विद्युत रोषणाई व फुलांनी सजवलेल्या रथावर विराजमान करण्यात आल्या होत्या. जयघोष, फटाक्यांची आतषबाजी आणि उत्साहपूर्ण वातावरणात मिरवणूक पार पडली. पडघा पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक जितेंद्र ठाकूर यांनी प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून मिरवणुकीचे उद्घाटन केले.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन



रावेर (स. गांवकरी) : भारतरत्न माहामानव डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त देवाभाऊ फाऊंडेशन तर्फे विनम्र अभिवादनकरण्यात आले. कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन जळगाव जिल्हा तर्फे माल्यार्पण व अभिवादन करण्यात आले . भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, महान समाज सुधारक व दलित, आदिवासींचे कैवारी बहुजन वंचितांच्या न्याय हक्कांसाठी आयुष्यभर लढणारे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे समता, बंधुता व न्याय यांचे प्रणेते होते. त्यांनी शिक्षण, सामाजिक सुधारणा व संविधानाच्या माध्यमातून देशाला नवी दिशा दिली. त्यांच्या विचारांना समाजात समता, बंधुता व न्याय यांचा संदेश देण्याच्या उद्देशाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या सिव्हिल हॉस्पिटल समोरील पुतळ्यास श्री. अनिल वाघ साहेब पोलिस निरीक्षक जिल्हा पेठ पोलिस स्टेशन जळगाव यांच्या हस्ते माल्यार्पण करण्यात आले. कार्यक्रमाचे आयोजन देवाभाऊ फाऊंडेशन जळगाव लोकसभा सहसमन्वयक प्रल्हाद सोनवणे प्रमोद वाणी कर्तव्यदक्ष पोलिस मित्र फाऊंडेशन जिल्हाध्यक्ष विनोद पवार यांनी केले.

# टंचाई व विकासकामांवर आमदार दातेंची आढावा बैठक

**पंचायत समिती पारनेर येथे बैठक**



पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर पंचायत समितीच्या सभागृहात टंचाई व विविध विकासकामांची आढावा बैठक पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघाचे आमदार काशिनाथ दाते यांच्या अध्यक्षतेखाली उत्साहात व शिस्तबद्ध वातावरणात पार पडली. गटविकास अधिकारी दिलीप सोनकुसळे यांच्या उपस्थितीत झालेल्या या बैठकीत तालुक्यातील विविध विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेत प्रशासनाला अधिक गतिमान व लोकाभिमुख करण्यासाठी महत्त्वपूर्ण सूचना देण्यात आल्या. विविध लोकप्रतिनिधी, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. बैठकीत जिल्हा परिषद बांधकाम विभागाच्या कामांबाबत आमदार दाते यांनी स्पष्टपणे सांगितले की, कोणत्याही परिस्थितीत कामाच्या गुणवत्तेत तडजोड होणार नाही. नागरिकांच्या तक्रारी आल्यास संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळी जाऊन तपासणी करून तत्काळ तोडगा काढावा, तसेच सर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत यासाठी काटेकोर नियोजन करण्याचे निर्देश त्यांनी दिले. ग्रामीण पाणीपुरवठा विभागाच्या कामांचा आढावा घेताना जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या योजनांची प्रत्यक्ष पाहणी करून ग्रामस्थांच्या तक्रारी जाणून घेण्याचे आदेश देण्यात आले. अपूर्ण कामांना पूर्णत्वाचा दाखला देऊ नये, तसेच १ जूनपर्यंत संपूर्ण अहवाल सादर करण्याचे निर्देश देत योजनांची गुणवत्ता व पारदर्शकता राखण्यावर त्यांनी भर दिला. त्याचबरोबर लघु पाटबंधारेची कामे पावसाळ्यापूर्वी पूर्ण करण्याबाबतही सूचना देण्यात आल्या. घरकुल योजनांच्या आढाव्यात प्रधानमंत्री आवास, रमाई, शबरी आदी योजनांतील अपूर्ण घरे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले. लाभार्थ्यांशी थेट संवाद साधून कामे गतीने पूर्ण करण्याचे निर्देश देताना आमदार दाते यांनी नुकत्याच पार पडलेल्या अधिवेशनात त्यांनी मांडलेल्या मागणीचा उल्लेख केला आणि राज्य शासनाने घरकुल अनुदानात ५० हजार रुपयांची वाढ केल्याची महत्त्वाची माहिती दिली. या निर्णयामुळे ग्रामीण भागातील अनेक कुटुंबांना मोठा दिलासा मिळणार असल्याचे त्यांनी नमूद केले. याशिवाय 'लाडकी बहिण' योजनेतील अपूर्ण ई-केवायसीसाठी विशेष शिबिरे आयोजित करण्याचे, आरोग्य विभागाने लसीकरण मोहिम वेळेत पूर्ण करण्याचे तसेच पशुसंवर्धन विभागाने नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना त्वरित भरपाई देण्याचे निर्देश देण्यात आले. स्वच्छ भारत मिशन अंतर्गत प्रलंबित कामे तात्काळ पूर्ण करण्यासाठी ठेकेदारांवर कठोर कारवाई करण्याचा इशाराही त्यांनी दिला. तालुक्यातील पाणीटंचाईच्या पार्श्वभूमीवर सध्या सुरू असलेल्या टँकर पाणीपुरवठ्याचा आढावा घेत कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर देण्याच्या सूचना करण्यात आल्या. रोजगार हमी योजनेतील कामांना गती देऊन अधिकाधिक नागरिकांना लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने सक्रिय भूमिका घ्यावी असेही त्यांनी सांगितले.

यावेळी भाजपचे नेते विश्वनाथ कोरडे, तालुकाध्यक्ष विक्रम कळमकर, सुषमा रावडे, सचिन भाऊ वराळ, सुनील थोरात, सोनाली सालके, सुभाष दुधाडे, नगरसेवक पै. युवराज पठारे, अशोक चेडे, सरपंच डॉ. नितीन रांधवन, अपर्णा खामकर, राजेंद्र उबाळे, विठ्ठल कवाद, रोहिदास लामखडे, स्वप्नील ठुबे, राजेंद्र ठुबे, विस्तार अधिकारी कैलास जगताप, संजय जगताप, बाळासाहेब मेहेत्रे, प्र. उप अभियंता किरण जाधव, उप अभियंता अंकुश पावसे, आरोग्य अधिकारी डॉ. प्रकाश कांबळे, शाखा अभियंता सचिन रामदिन, पशुधन विकास अधिकारी डॉ. स्नेहल गवारे, बालविकास अधिकारी दिपक मेहेत्रे, कमल राऊत, कृषी अधिकारी बाळासाहेब रासकर, मनिषा शिंदे, विस्तार अधिकारी राठोड, तालुक्यातील सर्व ग्रामपंचायत अधिकारी, टंचाई विभाग प्रमुख किशोर शिंदे, रोजगार हमी विभाग सुमित बोरुडे, कारखिले इ. मान्यवर उपस्थित होते.

## जाब विचारल्याने डोक्यात फोडली बियरची बॉटल

टिटवाळा : (स. गांवकरी)



खडकपाडा पोलीस स्टेशनच्या हद्दीतील मोहने येथील सिद्धार्थ शाळेसमोर ऐन 14 एप्रिल च्या पहाटे मद्यधुंद अवस्थेत असलेल्या तरुणाने हवेत उडवलेली बियर बाजूने जात असलेल्या इसमाच्या अंगावर पडल्याने त्याने याबाबत चा जाब विचारल्या नंतर मद्यधुंद अवस्थेतील तरुणाने चक्क बियर ची बाटली फिर्यादीच्या डोक्यात हाणून रक्तबंबाळ केल्याची घटना घडली असून याबाबत खडकपाडा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबतचे सविस्तरवृत्त असे कि, फिर्यादी सिद्धांत लाला पोवार (वय 25 वर्ष ) राहणार आर.एस. जेतवन नगर व त्याचा मित्र प्रवीण फूलचंद आल्हाट हे दिनांक 14 एप्रिल रोजी पहाटे 4.30 ते 5.30 च्या सुमारास सिद्धार्थ शाळेसमोरून जात असतानां तिथे त्याच्या ओळखीचा मित्र संतोष उद्धव बनसोडे हा त्या ठिकाणी दारू पिऊन बियरच्या बाटलीमधील बियर हवेत उडवत होता. सदर बाटलीतील बियर हि फिर्यादी सिद्धांत पोवार याच्या अंगावर पडल्याने त्याने आरोपी संतोष बनसोडे यास तू इथे बियर का उडवतोस असे बोलले असता या गोष्टीचा राग मनात धरून संतोष याने सिद्धांत याला शिवीगाळ करीत हातातील बियरची बाटली त्याच्या उजव्या कपाळावर मारली. व तिथून तो पळून गेला सिद्धांत याच्या कपाळातून मोठ्याप्रमाणात रक्तस्त्राव होत असल्याने त्याचा मित्र प्रवीण आल्हाट याने त्याला मोटारसायकल वर घेऊन जाऊन गणपती हॉस्पिटल येथे दवाउपचार केला.

## ध्येय मल्टीस्टेट'चा तपास थंडावल्याने ठेवीदार चिंताग्रस्त

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



नगर शहरासह जिल्ह्यात 'ध्येय मल्टीस्टेट'च्या शाखा सुरु करून ठेवीदारांना ज्यादा परताव्याचे आमिष दाखवत कोट्यावधी रुपयांच्या ठेवी गोळा करून त्या परत न देता सर्व शाखा बंद करून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केल्याचा गुन्हा दाखल होवून तब्बल २ वर्ष होत आली आहेत. तरीही या गुन्ह्यातील मुख्य आरोपी असलेला चेअरमन विशाल भागानगरे अद्यापही फरार असून तो तोफखाना पोलिसांना सापडत नाही. आता तर या गुन्ह्याचा तपासही थंडावला असल्याने ठेवीदार चिंतेत असून भागानगरे सह अन्य आरोपींना तातडीने अटक करून त्यांच्या मालमत्ता जप्त करण्याची मागणी ठेवीदारांनी केली आहे.

'ध्येय मल्टीस्टेट' कडून ठेवीदारांची कोट्यावधींची फसवणूक केल्याप्रकरणी ठेवीदार सुजाता संदीप नेवसे यांनी १६ मे २०२४ रोजी नगरच्या तोफखाना पोलिस ठाण्यात फिर्याद दिलेली आहे. त्यावरून ११२ ठेवीदारांची ५ कोटी ७८ लाख ६५ हजार रुपयांची फसवणूक केल्याचा गुन्हा संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरे याच्यासह ७ संचालकांच्या विरुद्ध दाखल झालेला आहे. त्यानंतर अपहाराची रक्कम आता ७ कोटी ६ लाख ३० हजारांवर पोहोचली आहे. या रकमेत अजूनही वाढ होण्याची शक्यता आहे. या गुन्ह्याचा तपास तोफखाना पोलिसांकडून अतिशय संथ गतीने आणि आरोपींना सहाय्य होईल अशा पद्धतीने सुरु असल्याचा आरोप ठेवीदारांकडून केला जात आहे. पोलिसांच्या या भूमिकेमुळेच २ संचालकांना अटकेपासून संरक्षण मिळालेले आहे. यातील एक आरोपी व्हाईस चेअरमन रोहिदास सत्यदेव कवडे याला गुन्हा दाखल झाल्यावर तब्बल ९ महिन्यांनंतर २७ फेब्रुवारी २०२५ रोजी पोलिसांनी अटक केली. मात्र आता २ वर्ष होत आले तरी मुख्य सूत्रधार आणि संस्थेचा चेअरमन विशाल भागानगरे सह इतर आरोपी अजूनही मोकाट फिरत आहेत. पोलिसांना ते का सापडत नाहीत? या मागील गौडबंगाल काय? असा सवाल ठेवीदार करत आहेत. या गुन्ह्याचा तपास योग्य रीतीने होवून ठेवीदारांना त्यांचे पैसे परत मिळावेत यासाठी हा गुन्हा आर्थिक गुन्हे शाखेकडे वर्ग करण्याची मागणी ठेवीदारांनी अनेकदा केली. मात्र त्यांनाही तोफखाना पोलिसांनी तसेच वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपींच्या सारखी वागणूक देत वेळोवेळी वाटे लावले आहे. त्यामुळे तोफखाना पोलिसांची भूमिकाही संशयास्पद असून आता पोलिस अधिक्षक सोमनाथ घार्गे यांनी यात लक्ष घालून ठेवीदारांना न्याय मिळवून द्यावा अशी मागणी ठेवीदार करत आहेत. ठेवीदारांनी नुकतीच तोफखाना पोलिस ठाण्याचे पो.नि. जगदीश भांबळ यांची ही भेट घेत या गुन्ह्याच्या तपासाला गती द्यावी, आरोपींना तातडीने अटक करावी, आरोपी हे त्यांच्या मालमत्तांची विल्हेवाट लावत असून त्या संदर्भात संबंधित यंत्रणेशी पत्रव्यवहार करून आरोपींच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या मालमत्ता जप्त कराव्यात.

## १९ एप्रिल रोजी श्रीराम मंदिर नवीपेठ येथे विराट हिंदू संमेलनाचे आयोजन

- मिवणूक,प्रबोधनपर व्याख्यानांचे आयोजन, तयारीला वेग
- प्रखर हिंदुत्ववादी वक्ते सुरेश चव्हाणके व संत हभप गोविंद शास्त्री जाटदेवळेकर महाराज यांची उपस्थिती

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



रविवार दि. १९ एप्रिल २०२६ रोजी अहिल्यानगर शहराच्या मध्यवस्तीत कापड बाजार भागात होणाऱ्या विराट हिंदू संमेलनाच्या निमित्ताने सायंकाळी साडेचार वाजता आडते बाजार येथील प्रभू श्रीराम मंदिर येथून भव्य शोभायत्रेचे आयोजन करण्यात आले आहे.शोभा यात्रेचा मार्ग डाळ मंडई,तेली खुंट चौक, शहाजीराजे मार्ग, भिंगारवाला चौक,अर्बन बँक रोड,शहर सहकारी बँक येथे शोभा यात्रेचा समारोप होणार आहे. या शोभायात्रेत मंगल कलश घेऊन महिला तसेच पारंपारिक पोशाखामध्ये हिंदू समाज मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहे.तसेच या मिरवणुकीमध्ये भव्य श्रीरामाची मूर्ती,स्वसंरक्षणासाठी लाठी, काठी व तलवारबाजी करणाऱ्या मुली व भगवे ध्वज, तसेच विविध महापुरुषांच्या वेशभूषा केलेली बालके हे मिरवणुकीचे मुख्य आकर्षण ठरणार आहे. मिरवणुकीचा समारोप नवीपेठ येथील श्रीराम मंदिर येथे होणार आहे. विराट हिंदू संमेलनाचे प्रमुख अतिथी प्रखर हिंदुत्ववादी वक्ते व दिल्ली येथील सुदर्शन वृत्तवाहिनीचे मुख्य संपादक सुरेश चव्हाणके,पाथर्डी येथील संत हभप गोविंदशास्त्री मुकुंदकाका जाटदेवळेकर महाराज,प्रमुख वक्ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पश्चिम महाराष्ट्र प्रांत कुटुंब प्रबोधन प्रमुख नरेश करपे हे आहेत.

विराट हिंदू संमेलनाच्या माध्यमातून हिंदू समाजाला एकत्र आणण्याचा आणि संघटित हिंदू-समर्थ भारत हा संदेश जनतेपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार आयोजकांनी व्यक्त केला आहे." हिंदू सारा एक मंत्र हा,दाही दिशांना घुमवू या " या घोषवाक्याखाली आयोजित करण्यात आलेल्या या संमेलनामुळे अहिल्यानगर शहर परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. हिंदू समाजातील विविध घटकांमध्ये ऐक्य निर्माण करणे हा या संमेलनाचा मुख्य उद्देश आहे. जात,पंथ, भाषा,प्रांत यांचे भेद विसरून एकत्र येऊ या.कोहिनूर व परशुराम वस्ती यांच्या विराट हिंदू संमेलन समितीच्या पुढाकारातून हा उपक्रम राबविण्यात येत असून,नागरिकांनी सहकुटुंब सक्रिय सहभाग नोंदवावा. हिंदू धर्म, परंपरा, संस्कृती आणि मूल्यांचे जतन व संवर्धन करण्याचा संदेश या व्यासपीठावरून दिला जाणार आहे. बदलत्या सामाजिक परिस्थितीत संस्कृतीचे रक्षण आणि भावी पिढ्यांपर्यंत तिचा वारसा पोहोचवणे आवश्यक असल्याचे संमेलनाच्या आयोजकांनी सांगितले.

संमेलनाच्या माध्यमातून युवकांमध्ये राष्ट्रीयत्वाची जाणीव आणि देशभक्तीची भावना दृढ करण्यावर विशेष भर दिला जाणार आहे. समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन राष्ट्रनिर्मितीत सक्रिय भूमिका बजवावी,यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे.

## माती माफियांवर धडक कारवाई; वाहन जप्त

जुन्नर तालुका : (स. गांवकरी)

खिरेश्वर ता:-जुन्नर येथे अवैध माती उत्खननावर महसूल विभागाची धडक कारवाई करून तक्रारींनंतर माती माफियांना चाप,वाहन जप्त करून चालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे जुन्नर तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील खिरेश्वर येथे माती माफियांच्या विरोधात महसूल विभागाने बेधडक कारवाई करत माती माफियांच्या विरोधात महसूल विभागाने कडक नियोजन केल्याचे या कारवाईतून दिसून येत आहे. तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागातील पेसा क्षेत्रातील गावां मध्ये मोठ्या प्रमाणावर मातीसह गौण खनिजांचे उत्खनन व वाहतूक नियमितपणे होत असल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक व विविध संस्थांकडून केल्या जात होत्या.या तक्रारींची दखल घेत तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांच्या नेतृत्वाखालील महसूल विभागाच्या पथकाने बुधवार दि:-१५ रोजी खिरेश्वर येथे कारवाईचा बडगा उचलला. खिरेश्वर परिसरात अनधिकृतपणे मातीचे उत्खनन व वाहतूक होत असल्याची माहिती महसूल प्रशासनाला मिळाली.या माहितीच्या आधारे तहसीलदार बाळासाहेब शिरसट यांनी या स्वतः लक्ष केंद्रित केले महसुलच्या पथकाला सोबत घेऊन संबंधित ठिकाणी धाव घेतली. या दरम्यान गाडी क्रमांक एमएच १४ एमबी २२७७ हे वाहन माती वाहतूक करताना आढळले. या वाहनातजवळपास पाच ब्रास इतकी माती आढळून आली.या वाहनाद्वारे अनधिकृत पणे माती वाहतूक केली जात असल्याने या वाहनावर तसेच वाहन चालकावर पथकाकडून कारवाई करण्यात आली.

# महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचाराला वेग

- पाथर्डी तालुक्यातील ३९ गावांतील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

अहिल्यानगर : (स. गांवकरी)



राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजप महायुतीचे उमेदवार अक्षय कर्डिले यांच्या प्रचारार्थ आमदार मोनिकाताई राजळे यांनी पाथर्डी तालुक्यात झंझावाती दौरा करून प्रचाराला मोठी चालना दिली. या दौऱ्यात तालुक्यातील तब्बल ३९ गावांमध्ये त्यांनी नागरिकांशी थेट संवाद साधत अक्षय कर्डिले यांना विजयी करण्याचे आवाहन केले.

या दौऱ्याला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून गावागावांतून "अक्षय कर्डिले यांना आमदार करायचे" असा निर्धार व्यक्त करण्यात आला. प्रचारादरम्यान महिलांपासून युवकांपर्यंत सर्व घटकांचा सहभाग दिसून आला, ज्यामुळे निवडणुकीचे वातावरण अधिक रंगतदार झाले आहे. यावेळी बोलताना आमदार मोनिकाताई राजळे म्हणाल्या की, "राहुरी-पाथर्डी-नगर विधानसभा पोटनिवडणूक ही विकासाच्या मुद्द्यावर लढवली जात आहे. गावातील गट-तट बाजूला ठेवून सर्वांनी एकत्र येत विकासासाठी मतदान करणे गरजेचे आहे. स्वर्गीय आमदार शिवाजीराव कर्डिले यांचे अपूर्ण स्वप्न पूर्ण करण्यासाठी अक्षय कर्डिले यांना निवडून द्यावे.

त्या पुढे म्हणाल्या की, माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी मनाचा मोठेपणा दाखवत सहकार्याची भूमिका घेतली आहे, त्याबद्दल त्यांचे आभार.

स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले हे जनतेत राहणारे, शेवटच्या घटकापर्यंत पोहोचणारे नेते होते. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करून अनेक प्रश्न मार्गी लावले. राजळे यांनी पुढे सांगितले की, जिल्हा बँकेच्या माध्यमातून महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बचत गटांना कर्ज उपलब्ध करून देण्यात आले. दूध व्यवसायाला चालना मिळावी यासाठी गाय खरेदीसाठी कर्जरूपी मदत करण्यात आली. शेतकरी हिताचे अनेक निर्णय त्यांच्या माध्यमातून घेण्यात आले, ज्याचा फायदा आजही नागरिकांना होत आहे. या दौऱ्यात महापौर ज्योतीताई गाडे, सुभाष बर्डे, पुरुषोत्तम आठरे, संभाजी पालवे, बाळासाहेब अकोलकर, संतोष शिंदे, वैभव खलाटे, जिजाबापू लोंढे, पोपट कराळे, दुर्योधन लोंढे, गौतम कराळे, अण्णासाहेब वांडेकर, मधुकर वांडेकर, धीरज मैड, रामकिसन वांडेकर, सुधाकर वांडेकर, मच्छिंद्र खाडे, रामेश्वर फसले, बाजीराव हजारे, शरद जाधव आदींसह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.

यावेळी पाथर्डी तालुक्यातील ग्रामस्थांनी आपल्या भावना व्यक्त करत सांगितले की, स्वर्गीय शिवाजीराव कर्डिले यांच्या दुःखद निधनानंतर अक्षय कर्डिले यांची जबाबदारी आता जनतेने स्वीकारली आहे. तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचून काम करणाऱ्या नेतृत्वाला साथ देणे हीच खरी श्रद्धांजली ठरेल.

ग्रामस्थांनी पुढे सांगितले की, स्वर्गीय कर्डिले यांनी जिरायत भागातील शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी सातत्याने पाठपुरावा करून वांबोरी चारीचा प्रश्न मार्गी लावला. त्यामुळे या भागातील पाणीटंचाई दूर होण्यास मदत झाली. या विकासकामांच्या बळावरच पाथर्डी तालुक्यातील ३९ गावांनी अक्षय कर्डिले यांना आमदार करण्याचा निर्धार केला आहे. एकूणच, या झंझावाती दौऱ्यामुळे पाथर्डी तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून अक्षय कर्डिले यांच्या बाजूने जनसमर्थन वाढत असल्याचे स्पष्ट चित्र दिसत आहे.

# थोडक्यात पण महत्वाचे



## डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या हस्ते नवनाथ बन यांचा सांगलीत सत्कार

सांगली (स. गांवकरी) : मुंबई महानगरपालिकेच्या नगरसेवक पदावर निवड झाल्याबद्दल भाजपाचे मुख्य प्रवक्ते व पत्रकार नवनाथ बण यांचा सांगली येथे पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. याप्रसंगी महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे राज्य सरचिटणीस तथा दैनिक समर्थ गांवकरीचे संपादक डॉ. विश्वासराव आरोटे यांनी नवनाथ बण यांना पुष्पगुच्छ देऊन गौरव केला. त्यांच्या या निवडीबद्दल उपस्थित मान्यवरांनी अभिनंदन करत पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. यावेळी ABP माझा च्या संपादिका सरीता कौशिक, सोलापूर महानगरपालिकेचे नगरसेवक मनीष केत, अशोक देढे तसेच संजय फुलसुंदर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमात उत्साहपूर्ण वातावरणात सत्कार सोहळा पार पडला.

## विवाहित अल्पवयीन मुलीवर सासरी अत्याचार; ७ जणांविरूध्द गुन्हा दाखल

अहिल्यानगर (स. गांवकरी) : एका अल्पवयीन मुलीचा (वय-१३) विवाह लावून देऊन तिचा शिंदोडी (ता. संगमनेर) येथे छळ करून अत्याचार केल्याची घटना समोर आली आहे. या प्रकरणी पीडितेच्या फिर्यादीवरून एमआयडीसी पोलीस ठाण्यात सात जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची घटना सन २०२४ पासून १० एप्रिल २०२६ पर्यंत फिर्यादीच्या सासरी शिंदोडी येथे घडली आहे. सदरचा गुन्हा तपासकामी घारगाव (ता. संगमनेर) पोलीस ठाण्यात वर्ग करण्यात आला आहे. पीडित अल्पवयीन मुलीचे मुकींदपूर, नेवासा फाटा (ता. नेवासा) येथील आई, वडिल व मध्यस्थी तसेच, शिंदोडी येथील सासू, सासरे, दीर आणि पती यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी मुळची मुकींदपूर, नेवासा फाटा येथील असून तिचा विवाह शिंदोडी येथील तरूणासोबत झाला होता.फिर्यादी अल्पवयीन असल्याचे माहित असूनही संशयित आरोपींनी संगनमत करून तिचा विवाह लावून दिला. लग्नानंतर फिर्यादी शिंदोडी येथे सासरी असताना पतीने फिर्यादीच्या इच्छेविरूध्द वेळोवेळी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. तसेच तिला शिवीगाळ करून मारहाण केली. पीडितेच्या सासूनेही तिला उपाशी ठेवून मानसिक व शारीरिक छळ केला. दरम्यान, या जाचाला कंटाळून अखेर पीडितेने पोलीस ठाण्यात धाव घेऊन आपबिती सांगितली. एमआयडीसी पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल केला असून घटनास्थळ घारगाव पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने हा तपास आता घारगाव पोलिसांकडे वर्ग करण्यात आला आहे.

## नवाब कविजंग व तक्क्यासाहेब यात्रेनिमित्त महाशिबीर उत्साहात

अहिल्यानगर (स. गांवकरी) :



भानसहिवरे येथे नबाब कविजंग व तक्या साहेब यात्रेनिमित्त अहिल्यानगर जिल्हा हेल्थकेअर असोसिएशन व पंडित हॉस्पिटल अहिल्यानगर व जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, भानसहिवरे यांचे संयुक्त विद्यमाने परिसरातील ग्रामस्थांसाठी मोफत रक्ततपासणी शिबिर व मोफत हृदयविकार, मधुमेह तपासणी शिबिर व रक्तदान शिबीर मोठ्या उत्साहात पार पडले. शिबिराचे उद्घाटन माजी सरपंच अशोकशेठ बोरा,नेवासा पंचायत समितीचे उपसभापती किशोर जोजार,डॉ.गजेंद्र गिरी मुख्याध्यापक श्री राजेश जगताप,विल्सन वंजारे,हिना बागवान, ( कॉन्स्टेबल कोतवाली पोलीस स्टेशन )व इम्रान आतार यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी डॉ. गजेंद्र गिरी यांनी मधुमेह,बी. पी.हृदयरोग, रुग्णाची तपासणी केली,व औषधोपचार केले. ग्रामस्थांच्या वतीने डॉ.गजेंद्र गिरी( MD),अहिल्यानगर ब्लड बँकेचे रामदास शेवाळे, समाधान कुडलकर, डॉ. प्रवीण तांबे,सोपान सुंबे यांचा सन्मान करण्यात आला. शिबिराचे आयोजन अहिल्यानगर हेल्थ केअर असोसिएशनचे अध्यक्ष विल्सन वंजारे व हिना बागवान कॉन्स्टेबल कोतवाली पोलीस स्टेशन यांनी केले.

**Adarsh Shikshan Vikas Mandal's**
**BHIMASHANKAR AYURVED COLLEGE**
At/P- Wadgaon Kashimbeg (Walunjwadi),
Manchar-Ghodegaon Road, Tal-Ambegaon, Dist.-Pune, 410503

दिनांक १३/०४/२०२६ रोजी प्रसारित जाहिरातीमध्ये रचना शारीर या विषयाचा संवर्गमध्ये दुरुस्ती असून प्राध्यापक पद खुला प्रवर्ग (Open) ऐवजी विमुक्त जाती (VJNT) करिता राखीव आहे. तसेच रसशास्त्र या विषयातील प्राध्यापक पद हे खुल्या प्रवर्ग (OPEN) ऐवजी अनुसूचित जाती (SC) करिता राखीव आहे.

**President** **Principal** **Secretary**
Bhimashankar Ayurved College,
Wadgaon Kashimbeg, (Walunjwadi), Tal Ambegaon, Dist Pune

**जाहीर नोटीस**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी अकोले यांचे कार्यालय ता. अकोले, जि. अहमदनगर यांचे न्यायालयात...**

क्र.कावि/जन्म/मृत्यु नोंद/२१/२०२६ अकोले दि. १७/०४/२०२६

तमांम नागरिकांस कळविण्यात येते की,

ज्याअर्थी अर्जदार **श्रीम. अनुसया रामचंद्र चौधरी, रा. भंडारदरा**, ता. अकोले, जि. अहिल्यानगर यांनी जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ कलम १३(३) अन्वये **अर्जदार यांचे पती कै. रामचंद्र तुकाराम चौधरी यांचा मृत्यू दि. १०/१२/२००४** रोजी **मौजे भंडारदरा** येथे झाला असुन त्यांच्या **पतीच्या** मृत्यूची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय भंडारदरा**, ता. अकोले यांचे जन्म–मृत्यु रजिस्टरला नोंद आदेश होणेकामीचा अर्ज मे तहसिल कार्यालय येथे दाखल केला आहे.

तरी **श्रीम. अनुसया रामचंद्र चौधरी, रा. भंडारदरा**, ता. अकोले जि. अहिल्यानगर **अर्जदार यांचे पती कै. रामचंद्र तुकाराम चौधरी यांचा मृत्यू दि. १०/१२/२००४** रोजी **मौजे भंडारदरा** येथे झाला असल्याची नोंद **ग्रामपंचायत कार्यालय भंडारदरा**, ता. अकोले येथे मृत्यूची नोंद होण्याबाबत कोणाची काही हरकत अगर तक्रार असल्यास त्यांनी सदर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ३० दिवसाचे आत योग्य त्या कागदपत्राच्या पुराव्यांसह हरकत मे. कोर्टासमोर हजर होऊन पुराव्या निशी दाखल करावी अन्यथा सदर मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत प्राप्त न झाल्यास सदर मृत्यूची नोंद करण्यास कोणाचीही हरकत नाही, असे समजुन मे. न्यायालय पुढील योग्य तो आदेश पारीत करण्यात येईल. तदनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

आज दि. १७/०४/२०२६ रोजी सही व शिक्क्यानिशी दिले असे.

हुकूमावरुन,
कामगिरी क्लर्क तहसिलदार तथा
कार्यकारी दंडाधिकारी, अकोले

# विद्यार्थ्यांनी स्वत:च्या स्वप्नांना बळ द्यावे - अभय आव्हाड

## श्री विवेकानंद प्राथमिक शाळेतील तालुक्यात सर्वाधिक विद्यार्थी गुणवत्ता यादीत

पाथर्डी : (स. गांवकरी)



शालेय जीवनातील स्पर्धा ही राज्यसेवा व लोकसेवा स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी आहे. या शालाबाह्य स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी अभ्यासात सातत्य ठेवून स्वतःच्या स्वप्नांना बळ द्यावे असे प्रतिपादन पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व नगराध्यक्ष अभय आव्हाड यांनी केले. पार्थ विद्या प्रसारक मंडळ संचलित श्री विवेकानंद प्राथमिक विद्यामंदिर पाथर्डी या शाळेतील राज्यस्तरीय मंथन स्पर्धा परीक्षेत ५३ विद्यार्थ्यांनी राज्य,जिल्हा व तालुका गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते नुकताच संपन्न झाला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष अभय आव्हाड होते. यावेळी अभय आव्हाड म्हणाले,की शालेय स्तरावर विविध स्पर्धा परीक्षेचे मार्गदर्शन केल्यामुळे विद्यार्थ्यांची यूपीएससी व एमपीएससी या स्पर्धा परीक्षांची पूर्वतयारी होते. विद्यार्थ्यांमध्ये स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण होऊन चांगल्या प्रकारे यश संपादन करत आहेत. विद्यार्थ्यांनी दरवर्षी अभ्यासात सातत्य ठेवावे व आपले स्वतःचे व आई वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी ब आपल्या पंखांना बळ द्यावे.विद्यार्थ्यांच्या या यशामध्ये मार्गदर्शक शिक्षक व पालकांचे महत्त्वाचे स्थान आहे. यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचे व पालकांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांनी उन्हाळी सुट्टीमध्ये मोबाईल पासून अलिप्त राहून विविध प्रकारच्या पुस्तकांचे वाचन करावे तसेच मैदानी खेळ खेळावेत असे आवाहन यावेळी केले. शाळेतील इयत्ता पहिलीतील शिवदीप दिलीप ठोंबरे व इयत्ता दुसरीतील अवनी सोपान डांगे, तनिष्का तानाजी सानप, शिया ज्ञानेश्वर टेकाळे, हंपे आर्या अमित ,मनियार उमेर परवेज व इयत्ता तिसरीतील आतार माहिरा रईस या आठ विद्यार्थ्यांची राज्यगुणवत्ता यादीत निवड झाली तसेच १७ विद्यार्थी जिल्हा गुणवत्ता यादीत तर २८ विद्यार्थी तालुका गुणवत्ता यादीत स्थान प्राप्त केले. या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना पेढे भरवून, फेटे बांधून व शैक्षणिक साहित्य देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी बहुसंख्येने पालक उपस्थित राहून निकालाबाबत समाधान व आनंद साजरा केला.

**विद्यार्थी गौरव कार्यक्रम प्रसंगी पार्थ विद्या प्रसारक मंडळाचे अध्यक्ष व पार्थ नगरीचे नगराध्यक्ष अभय आव्हाड, माध्य. विभाग मुख्याध्यापक शरद मेढे, समन्वयक ज्ञानेश्वर गायके, प्राथ. विभाग मुख्याध्यापिका अनुजा कुलकर्णी व पालक उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ज्ञानेश्वर गायके यांनी केले तर आभार जयश्री एकशिंगे यांनी मानले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांना अनुजा कुलकर्णी,जयश्री एकशिंगे, मनिषा गायके, आशा बांदल,राधिका सरोदे, ज्योती हंपे ,किर्ती दगडखैर, विद्या घोडके यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले.**



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती विविध उपक्रमांनी साजरी

नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा तालुक्यातील प्रवरासंगम येथे महामानव भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांची १३५ वी जयंती विविध उपक्रमांनी साजरी करण्यात आली.

कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी सरपंच अर्चनाताई सुडके हया होत्या.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यामुळेच आज विविध क्षेत्रात स्त्री ही उच्च पदावर कार्यरत आहे. स्त्री शक्तीच्या उद्धारासाठी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा मोठा आधार मिळाला असल्याचे प्रतिपादन सरपंच सौ.अर्चनाताई सुडके पाटील यांनी यावेळी बोलतांना केले. यावेळी झालेल्या कार्यक्रम प्रसंगी माजी सरपंच सुनीलराव बाकलीवाल व जयंती समितीचे अध्यक्ष माजी उपसरपंच नितीनराव गायकवाड,भारतीय लहुजी सेनेचे जिल्हा कार्याध्यक्ष शांतावन खंडागळे, संतोष मोरे, युवा नेते शुभम उगले, गजानन गवारे, नवनाथ चाबुकस्वार, टोका उपसरपंच काकासाहेब खंडागळे नितीन भालेराव यांच्या हस्ते पुष्पहार घालून व मेणबत्ती लावून डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.

# आमदार दातेंच्या हस्ते कामगारांना प्रमाणपत्र वाटप



> "बांधकाम कामगारांसाठीच्या शासकीय योजनांचा लाभ देताना ऑनलाईन प्रक्रियेसाठी केवळ अधिकृत फीच आकारावी. त्याव्यतिरिक्त जादा रक्कम घेणे चुकीचे असून असे प्रकार तात्काळ थांबवावेत. यापुढे कष्टकरी कामगारांवर होणारा अन्याय खपवून घेतला जाणार नाही."
> **- आमदार काशिनाथ दाते सर (विधानसभा सदस्य)**

पारनेर : (स. गांवकरी)

पारनेर-नगर विधानसभा मतदारसंघातील कष्टकरी बांधकाम कामगारांच्या हक्कांना बळ देणारा महत्त्वपूर्ण उपक्रम आज पार पडला. आमदार काशिनाथ दाते यांच्या शुभहस्ते पारनेर तालुक्यातील पाचशेहून अधिक बांधकाम कामगारांना अधिकृत बांधकाम कामगार प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले. या उपक्रमामुळे कामगारांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा थेट लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. यावेळी आमदार दाते यांनी उपस्थित कामगारांना मार्गदर्शन करत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती दिली. यात अपघात विमा योजना, आरोग्य सहाय्य योजना, मुलांच्या शिक्षणासाठी शिष्यवृत्ती, प्रसूती लाभ योजना, घरकुल सहाय्य, साधनसामग्री खरेदीसाठी अनुदान, वृद्धापकाळ निवृत्ती वेतन, तसेच कामगारांच्या कुटुंबासाठी विविध आर्थिक सहाय्य योजनांचा समावेश असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र कामगारापर्यंत पोहोचावा यासाठी जनजागृती होणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी अधोरेखित केले.

याप्रसंगी आमदार दाते यांनी सांगितले की, "बांधकाम कामगार हा विकासाचा खरा शिल्पकार आहे. त्याच्या कष्टाचा सन्मान होणे ही शासनाची आणि समाजाची जबाबदारी आहे. शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक कामगारापर्यंत पोहोचवण्यासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत."

तसेच मतदारसंघातील बांधकाम कामगारांना या योजना प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करणाऱ्या राज्य शासनाचे त्यांनी मनापासून अभिनंदन केले. यामध्ये महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, संबंधित विभागाचे मंत्री आकाश फुंडकर तसेच अहील्यानगर जिल्ह्याचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे विशेष आभार व्यक्त करण्यात आले.

या कार्यक्रमास जिल्हाध्यक्ष अशोकराव सावंत, तालुका राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला उपाध्यक्षा जयश्री शिंदे यांसह विविध मान्यवर उपस्थित होते. मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या बांधकाम कामगारांनी या उपक्रमाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले. हा उपक्रम म्हणजे केवळ प्रमाणपत्र वाटप नसून, कष्टकरी कामगारांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या हक्कांच्या जाणीवेचा एक महत्त्वाचा टप्पा ठरत असल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# राष्ट्रीय शैक्षणिक धोरणानुसार युवा पिढीने नवनवीन कौशल्य आत्मसात करावे : माजी मंत्री हर्षवर्धन पाटील



इंदापूर : (स. गांवकरी)

इंदापूर तालुका शिक्षण प्रसारक मंडळाच्या कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा महाविद्यालयाच्या शाहीर अमर शेख सभागृहामध्ये पार पडला यावेळी बोलताना राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष, माजी मंत्री व संस्थेचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी वरील मत व्यक्त केले. यावेळी पिंपरी चिंचवड विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे उपस्थित होते.

हर्षवर्धन पाटील म्हणाले की,' नवीन शैक्षणिक धोरणामुळे शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल झाले असून विद्यार्थ्यांनी नवनवीन कौशल्य आत्मसात केली पाहिजे. विविध भाषा, तंत्रज्ञान आणि संशोधन वृत्ती जोपासणे आवश्यक आहे.

कुलगुरू डॉ. संतोष सोनवणे म्हणाले की,' आजच्या स्पर्धेच्या युगात विद्यार्थ्यांसाठी मोठ्या संधी उपलब्ध आहेत. बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या गरजा ओळखून कौशल्यधिष्ठित विद्यार्थी होण्यासाठी आपण प्रयत्नशील राहिले पाहिजे. माजी मंत्री हर्षवर्धन पाटील यांच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड विद्यापीठ विद्यार्थ्यांना जागतिक संधी उपलब्ध करून देत आहे.एआय भीती नसून ती एक संधी आहे.

यावेळी शैक्षणिक, कला, क्रीडा व इतर क्षेत्रातील गुणवंत विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी संस्थेचे सचिव ॲड. मनोहर चौधरी, संस्थेचे संचालक विलासराव वाघमोडे, तुकाराम जाधव, सुरेश मेहेर, पराग जाधव तसेच इंदापूर अर्बन बँकेचे संचालक मच्छिंद्र शेटे, निराभिमा सहकारी साखर कारखान्याचे संचालक राजकुमार जाधव उपस्थित होते. प्रमुख पाहुण्यांचे स्वागत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जीवन सरवदे यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. दत्तात्रय गोळे यांनी केले. पुरस्काराचे वाचन कला विभागाचे प्रमुख डॉ. भरत भुजबळ, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. सदाशिव उबंरदंड, डॉ. राजाराम गावडे, डॉ. बाळासाहेब काळे, कनिष्ठ विभागाचे क्रीडाशिक्षक प्रा. बापू घोगरे यांनी केले. विद्यापीठ व महाविद्यालय गीत प्राध्यापिका स्वाती राऊत यांनी गायले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. रोहिदास भांगे यांनी केले. तर आभार विज्ञान विभाग प्रमुख डॉ. शिवाजी वीर यांनी मानले.

# पुण्यतिथी गुरुचरित्र पारायण व महाआरतीने साजरी



नेवासा : (स. गांवकरी)

नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरात असलेल्या स्वामी समर्थ महाराज केंद्रातील सेवेकऱ्यांच्या वतीने श्री स्वामी समर्थ महाराजांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने गुरुचरित्र पारायण सोहळयाचे आयोजन करण्यात आले होते यावेळी आरती करून स्वामींची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. नेवासा येथील दुर्गादेवी मंदिरात असलेल्या श्री स्वामी समर्थ केंद्रामध्ये पुण्यतिथी निमित्त सप्ताहभर गुरुचरित्र ग्रंथाचे सेवेकऱ्यांनी पारायण केले. नित्यनेमाने स्वामींची प्रतिमा पूजन नैवेद्य अर्पण करून आरती करण्यात आली. गुरुचरित्र पारायणाला महिला भगिनी सेवेकऱ्यांची संख्या लक्षणीय होती. स्वामींच्या पुण्यतिथी निमित्ताने सप्ताहभर चाललेल्या पारायणाची स्वामींच्या नाम जपाने व महा आरतीने भक्तिमय वातावरणात सांगता करण्यात आली उपस्थित भाविकांना महाप्रसादाचे वाटप यावेळी करण्यात आले.पुण्यतिथी निमित्ताने स्वामींची प्रतिमा पुष्पांनी सजविण्यात आली होती.यावेळी नेवासा शहरातील भाविकांनी स्वामींच्या दर्शनासाठी दुर्गादेवी मंदिरात गर्दी केली होती.

# 'आदर्श माता' पुरस्कारातून महिलांना प्रेरणा मिळते : ॲड. वर्षाताई देशपांडे

- मिरजगाव येथे आदर्श मातांचा 'स्वाभिमानी माऊली पुरस्कार' देऊन सन्मान !

कर्जत : (स. गांवकरी)



मुलांच्या आयुष्यातील आई ही सर्वात महत्त्वाची, प्रेमाची आणि त्यागाची मूर्ती असुन गरजा समजावून घेणारी एक आदर्श व्यक्ती आहे. जी मुलाच्या संगोपनासाठी निस्वार्थपणे अथंक मेहनत घेते, ती केवळ जन्म देत नाही, तर आरोग्य, शिक्षण आणि स्वच्छतेची काळजी घेऊन मुलांचे भविष्य घडवते, आई-वडीलांची सेवा करा. त्यांची सेवा करणाऱ्याला कुठेही जाण्याची गरज नाही. आईचे प्रेम अतुलनीय आहे, भारतीय संस्कृती जपण्यासाठी आदर्श माता पुरस्कारासारख्या कार्यक्रमांची गरज आहे. यातून महिलांना प्रेरणा मिळते, असे प्रतिपादन संयुक्त राष्ट्र संघाचा- आंतरराष्ट्रीय पुरस्कार विजेत्या व राष्ट्रीय महिला आयोग पॅनल ॲडव्होकेट ॲड.वर्षाताई देशपांडे यांनी केले. कर्जत तालुक्यातील मिरजगाव येथे कै.कौशल्याबाई भानुदास गोरे यांच्या पाचव्या पुण्यतिथी सोहळ्यानिमित्त श्री. साई बालाजी प्रतिष्ठान, आयोजित "स्वाभिमानी माऊली पुरस्कार वितरण सोहळा" कार्यक्रम बुधवारी, दि.१५ रोजी पार पडला. या कार्यक्रमात त्या बोलत होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आष्टी -पाटोदा-शिरूर मतदारसंघाचे माजी आमदार साहेबराव दरेकर हे होते.

यावेळी समाजातील कर्तृत्ववान महिलांचा ज्यांनी आपली मुले अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून घडविले. त्यांना उच्चशिक्षण देऊन समाजात आदर्श बनविले. अशा आठ कर्तृत्ववान आदर्श मातांना 'स्वाभिमानी माऊली पुरस्कार ' देऊन ॲड. वर्षाताई देशपांडे यांच्या शुभहस्ते गौरविण्यात आले.

यामध्ये महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती ना.प्रा.राम शिंदे यांच्या मातोश्री श्रीमती.भामाबाई शंकर शिंदे (चौंडी), पत्रकार शिवाजी शिर्के यांच्या मातोश्री श्रीमती.कौसाबाई आप्पाजी शिर्के (कर्जुलेहरेश्वर, पारनेर), पत्रकार गणेश जेवरे यांच्या मातोश्री श्रीमती.लिलावती जगन्नाथ जेवरे (कर्जत), श्रीमती.छायाबाई प्रदीप तेली (कर्जत) श्रीमती.लताताई नेटके, श्रीमती.पुष्पाताई रावसाहेब लगस (मिरजगाव), सौ.संगिता काशिबा तांबे (अरणगाव), सौ. पदमीनीबाई धनाजी सुर्यवंशी (चांदे खुर्द) यांना प्रमुख मान्यवरांच्या उपस्थितीत 'स्वाभिमानी माऊली पुरस्कार' देऊन शाल, श्रीफळ, ट्रॉफी देवून विशेष सन्मानित करण्यात आले. यावेळी पुणे येथील एसआयआरएफ ऑर्गनायझेशनचे संस्थापक सौ.सुमेधाताई चिताडे यांचा देखील विशेष सन्मान करण्यात आला. या कार्यक्रमास माजी आमदार साहेबराव दरेकर, ज्येष्ठ पत्रकार शिवाजी शिर्के, ज्येष्ठ नेते रमेशचंद्र झरकर, कर्जतचे मा.नगराध्यक्ष नामदेव राऊत, साई बालाजी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष हभप राजेंद्र गोरे, अर्चनाताई राजेंद्र गोरे, संत गजानन महाराज ग्रामीण विकास प्रतिष्ठानच्या अध्यक्षा सौ.कल्याणीताई शंकरराव नेवसे, सावता परिषदेचे तालुकाध्यक्ष डॉ.पंढरीनाथ गोरे, मा.जि.प.सदस्य गुलाब तनपुरे, नितिन खेतमाळस संपत बावडकर, लहू वतारे, हभप मनोहर रासकर, मिनिनाथ गोरे, सारंग घोडेस्वार, अमोल माने, दादा बुद्धीवंत, शिवाजीराव नवले, डॉ.विलास कवळे, सुभाष सुर्यवंशी, बबन म्हस्के, उमेश जेवरे, रविंद्र महाराज सुद्रीक, दत्ता राऊत, प्रा. सखाराम राजळे, दादा जवणे, पप्पू पवार, गणेश कोल्हे, राजाराम चिपाडे, मंदाताई चिपाडे, राहुल सोनमाळी, अंजना हरिश्चंद्र गोरे, मधुबाला गोरे, अशोक हिवाळे, सुदाम जवणे, विलास गायकवाड, सदाबापू शिंदे, बबन बनकर, सदाशिव जवणे, राजू केदारी, संदीप केदारी, ज्ञानदेव कोल्हे, जंजिरे मेजर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामस्थ, महिला भगिनी, बाल वारकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी श्री.साई बालाजी प्रतिष्ठान व गोरे परिवाराच्या वतीने उपस्थित ग्रामस्थांकरिता महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. माजी आमदार दरेकर म्हणाले, आजचा माणूस पैशाचा मागे लागला आहे. पैसा म्हणजे सर्वस्व समजू लागला आहे.

# मळगंगादेवीच्या घागरीसह शहरात पालखीची मिरवणूक

नेवासा : (स. गांवकरी)


निघोज वरून नेवासा येथे मळगंगादेवी मंदिरात आणलेल्या श्री मळगंगादेवीच्या घागरीचे व निघालेल्या पालखी मिरवणुकीचे नेवासा शहरात फटाक्यांची आतषबाजी करत उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. मळगंगादेवी मंदिराचे प्रमुख रेणुकादास उर्फ भाऊ घोलप यांनी पालखी मिरवणुकीचे नेतृत्व केले. नेवासा येथे एस टी स्टँड जवळ असलेल्या मळगंगा देवीच्या मंदिरापासून सायंकाळी ६.३० वाजता पालखी मिरवणुकीस प्रारंभ करण्यात आला. यावेळी निघोज येथून आणलेल्या



श्री मळगंगादेवीच्या घागरीची व पालखीची सुवासींनीनी पंचारती ओवाळून पूजा केली. अग्रभागी झेंडा काठी,त्यामागे बॅण्डपथक,पुष्पांनी सजविण्यात आलेली मळगंगादेवीची पालखी त्या मागे देवीच्या नावाचा जयघोष करणारे भाविक असे या पालखी मिरवणुकीचे स्वरूप होते.

नेवासा शहरातील एस टी स्टँड,नगरपंचायत चौक,शहरातील मुख्य पेठेतून पालखी काढण्यात आली. या पालखीचे नेवासेकरांनी फटाक्यांची आतषबाजी करत स्वागत करून दर्शन घेतले.घोलप परिवाराच्या वतीने देविभक्त रेणुकादास घोलप,सौ.सुमनताई घोलप,परशुराम घोलप,सौ.लताताई घोलप,रामभाऊ घोलप,सौ.ज्योती घोलप,सचिन घोलप,सौ.जयश्री घोलप,सागर घोलप,सौ. वैशाली घोलप,शाम घोलप,सौ.ज्योती घोलप,संदीप घोलप,सौ.भारती घोलप यांच्या हस्ते पालखीचे पूजन करण्यात आले. मळगंगादेवीच्या पालखी मिरवणुकीचा समारोप मळगंगादेवी मंदिर प्रांगणात झाल्यानंतर मळगंगा देवीच्या पालखीची संबळाच्या निनादात देवीची महाआरती करण्यात आली. महाआरतीला पालखी नेतृत्व करणारे देवीभक्त अशोक गावडे,बाळासाहेब म्हसे,जनार्धन व्यवहारे,ओम घोलप,झेंडे मिस्तरी,राजू यादव यांच्यासह भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उपस्थित भाविकांना आंबील महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. रात्री झालेल्या देवीचा जागरण गोंधळ कार्यक्रमाला ही भाविकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



ठाणे : नुकताच लागलेल्या Xth CBSE BOARD EXAM 2026 RESULT मध्ये माऊंट लिट्रेर झी स्कूल, नारोली, सिल्वासा, गुजरात येथे शाळेतून टॉपर Artificial Intelligence विषयात 100 पैकी 100 मार्क काढून आपल्या पुणे शहराचं नाव रौशन केले आहे. एकूण 93.20% टक्के मिळवत एका विषयात 100 पैकी 100 गुण मिळवत पुणे शहरातून दूर सिल्वासा गुजरात सिटीत आपले नाव कोरले आहे तिचा शिक्षणाचा प्रवास हा पुण्यापासून सुरवात करत दुबई - जम्मू काश्मीर आणि आता गुजरात सिल्वासा सिटी असा थक्क करणारा होता तरीही तिने आव्हान पेललं आणि करून दाखवलं, तिच्या या कर्तृत्वास सर्व स्तरातून शुभेच्छांचा वर्षाव होत आहे

## थोडक्यात बातम्या...



### महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या डिजिटल मीडिया अधिवेशनात मान्यवरांचे स्वागत!


सांगली (स. गांवकरी) : सांगली येथे महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या डिजिटल मीडिया अधिवेशन प्रसंगी राज्य संघटक संजय भोकरे तसेच राज्य सरचिटणीस डॉ. विश्वासराव आरोटे यांचे आगमन होताच त्यांचे उत्स्फूर्त स्वागत करण्यात आले. या अधिवेशनासाठी राज्यभरातील पत्रकार, संपादक व डिजिटल माध्यम प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संजय भोकरे व डॉ. विश्वासराव आरोटे यांच्या उपस्थितीमुळे अधिवेशनाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. यावेळी आयोजकांच्या वतीने त्यांचा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. डिजिटल युगात पत्रकारितेची बदलती दिशा, सोशल मीडियाचा वाढता प्रभाव आणि जबाबदार पत्रकारितेचे महत्त्व यांसारख्या विविध विषयांवर या अधिवेशनात सखोल चर्चा होणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

### अनिल ठवाळ यांची केंद्र सरकारच्या दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती



श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्यातील आढळगाव येथील अनिल ठवाळ यांची भारत सरकारच्या बीएसएनएल दूरसंचार सल्लागार समितीवर नियुक्ती झाल्याने परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे. साध्या कार्यकर्त्यापासून सुरू झालेला त्यांचा प्रवास आज केंद्र सरकारच्या पातळीपर्यंत पोहोचला असून, हा संघर्ष, जिद्द आणि सामाजिक बांधिलकीचा आदर्श मानला जात आहे. गेल्या ३० ते ३५ वर्षांपासून ठवाळ यांनी तळागाळातील नागरिकांसाठी सातत्याने कार्य केले आहे. कोणताही गाजावाजा न करता समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या कार्याची दखल घेत राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार आणि खासदार निलेश लंके यांच्या शिफारसीनंतर केंद्रीय दूरसंचार मंत्री ज्योतिरादित्य शिंदे यांच्या स्वाक्षरीने त्यांची सल्लागार समितीवर नियुक्ती करण्यात आली. ठवाळ यांच्या यशामागे खडतर संघर्षाचा प्रवास आहे. अनेक अडचणी, अपमान आणि प्रतिकूल परिस्थितीला सामोरे जात त्यांनी आपली वाटचाल कायम ठेवली. समाजसेवेचा ध्यास आणि जनतेप्रती असलेली निष्ठा यामुळेच त्यांना हे यश मिळाल्याची भावना व्यक्त होत आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, राजश्री शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनी प्रेरित होऊन त्यांनी सामाजिक कार्य केले असून, समानता, शिक्षण आणि न्याय या मूल्यांना त्यांनी सदैव प्राधान्य दिले आहे. या नियुक्तीमुळे आढळगावसह संपूर्ण परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले असून, विविध स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. ही नियुक्ती नव्या जबाबदारीची सुरुवात असून, आगामी काळातही ते समाजासाठी प्रभावीपणे कार्य करतील, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

### भिमा नदी पट्ट्यातील भक्कम रस्त्यामुळे नवी ओळख : गणेश गवळी



श्रीगोंदा (स. गांवकरी) : श्रीगोंदा तालुक्याचे कार्यसम्राट आमदार विक्रमसिंह पाचपुते यांच्या निधीतून भिमा नदी पट्ट्यात साकार होत असलेल्या नव्या रस्त्यांमुळे परिसराला नवी ओळख मिळत असल्याचे मत गवळवाडी येथील सामाजिक कार्यकर्ते गणेश गवळी यांनी व्यक्त केले. नुकतेच काष्टी येथील आ. पाचपुते यांच्या निवासस्थानी गवळी व त्यांच्या कार्यकर्त्यांनी भेट देत त्यांचा विशेष सत्कार केला. तळई ते म्हसोबावाडी तसेच गणेशा ते अजनुज या मार्गांवर तयार होत असलेल्या रस्त्यांमुळे काष्टीकडे जाणाऱ्या प्रवाशांसाठी हा सर्वात जवळचा आणि सोयीस्कर मार्ग ठरत आहे. काष्टी ही तालुक्यातील प्रमुख बाजारपेठ असल्याने या रस्त्याचे महत्त्व अधिक वाढले आहे. या सुविधेमुळे सुशिक्षित तरुणांना नवीन व्यवसायाच्या संधी उपलब्ध होतील, असा विश्वासही गवळी यांनी व्यक्त केला. पूर्वी पावसाळ्यात या भागातून प्रवास करणे अत्यंत कठीण होते. मात्र आता दर्जेदार रस्त्यांमुळे कमी वेळात तालुक्यातील विविध ठिकाणी सहज पोहोचणे शक्य झाले आहे. "गावाची ओळख आता रस्त्यांवरूनच ठरते," असेही गवळी यांनी नमूद केले. यावेळी ॲड. प्रतापसिंह पाचपुते, राहुल गवळी, हनुमंत गवळी, सोमनाथ गवळी, मनोहर कार्लेकर, नवनाथ गायकवाड यांसह गवळवाडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

# विल्होळी येथील प्राणघातक हल्ल्यातील संशयित दाम्पत्याला अटक

सर्वतिर्थ टाकेद : (स. गांवकरी)

१३ एप्रिलला नाशिक तालुका पोलीस ठाणे हद्दीत विल्होळी शिवारात सुरजकुमार मोहनलाल सोलंकी (जैन), रा. अमरधाम रोड, नानावली, जुने नाशिक याच्यावर प्राणघातक हल्ला झाला होता. त्याला कोणीतरी अज्ञात महिला व पुरुषाने मोबाईलवर झालेल्या बोलाचालीच्या कारणावरून लोखंडी कोयत्याने व दगडाने दोन्ही हातावर, मानेवर, डोक्याच्या मागील बाजुला गंभीर वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला आहे. म्हणुन नाशिक तालुका पोलीस ठाण्यात भा. न्या. सं. कलम १०९ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. हा गुन्हा केल्यानंतर यातील संशयित महिला व पुरुष यांनी अज्ञातस्थळी पलायन केले होते. ह्या घटनेचे गांभीर्य लक्षात घेता नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक बाळासाहेब



पाटील व अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर यांनी तात्काळ दखल घेऊन पोलीस पथकांना आरोपींच्या शोधासाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. ह्या घटनेच्या अनुषंगाने उपविभागीय पोलीस अधिकारी पेठ विभाग वासुदेव देसले, स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, नाशिक तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक मृदूला नाईक यांनी तात्काळ घटनास्थळी भेट देवुन घडल्या परिस्थितीची बारकाईने पाहणी केली. यातील जखमी सुरज सोलंकी याचे दैनंदिन कामकाज, पुर्व इतिहास व सध्याच्या वास्तव्याबाबत गोपनीयरित्या माहिती घेवुन तपासाची चक्रे फिरवली. त्यानुसार त्याचे अलिकडील कालावधीत एका महिलेशी वाद असल्याचे निदर्शनास आले होते. त्याप्रमाणे तपास केला असता, यातील महिला व तिचा पती हे दोघेजण घटना घडल्यापासुन फरार असल्याचे समजले. त्यावरून त्यांचा शोध घेतला असता १) हनुमंत आण्णासाहेब शिंदे, वय ४२, रा. अंधापुरी, ता. पाथरी, जि. परभणी, हल्ली रा. विठाई नगर, नामको हॉस्पिटलमागे, पेठरोड नाशिक, २) साधना हनुमंत शिंदे, वय ३७, रा. पैठण, जि. छत्रपती संभाजी नगर, हल्ली विठाई नगर, नागको हॉस्पिटल मागे, पेठरोड नाशिक या आरोपींना नाशिक व अहिल्यानगर जिल्ह्याच्या सीमावर्ती भागातील एका खेडेगावातून ताब्यात घेण्यात आले.

यातील आरोपी महिला साधना शिंदे हिच्याकडे गुन्ह्याच्या अनुषंगाने सखोल चौकशी केली असता, ह्या घटनेतील जखमी सुरज सोलंकी व आरोपी साधना शिंदे यांची दोघांची वाडीवऱ्हे येथील एका कंपनीत ओळख झाली होती. तेव्हापासून ते दोघे एकमेकांना ओळखत होते. कालांतराने सुरज सोलंकी हा साधना हिला ब्लॅकमेल करून, तिच्याकडे अनैतिक संबंधाची मागणी करू लागला. तो तिला व तिच्या परिवाराला जिवे मारण्याची धमकी देत होता. ह्या गोष्टीचा राग मनात धरून साधना व तिचा पती हनुमंत शिंदे यांनी दोघांनी मिळून त्याला विल्होळी शिवारात बोलावुन त्याच्याशी झटापट करून त्याच्या हातावर, मानेवर, डोक्याचे पाठीमागील बाजूस कोयत्याने व दगडाने गंभीर वार करून जिवे ठार मारण्याचा प्रयत्न केला असल्याची कबुली दिली आहे. ह्या २ संशयित आरोपींना ह्या गुन्ह्यात अटक करण्यात आली असून न्यायालयाने दोन दिवस पोलीस कोठडी रिमांड मंजुर केली आहे. ह्या गुन्ह्याचा पुढील तपास नाशिक तालुका पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षक मृदुला नाईक यांचे पथक करीत आहे. पोलीस अधीक्षक बाळासाहेब पाटील, अपर पोलीस अधीक्षक आदित्य मिरखेलकर व उपविभागीय पोलीस अधिकारी पेठ विभाग वासुदेव देसले यांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक दत्तात्रय शिंदे, नाशिक तालुका पो.स्टे. च्या पोलीस निरीक्षक मृदूला नाईक, स्थागुशाचे सपोनि नितीन रणदिवे, प्रकाश भालेराव, उपनिरीक्षक शैलेश पाटील, सपोउनि नवनाथ सानप, हवालदार प्रविण काकड, संदिप नागपुरे, रावसाहेब कांबळे, हेमंत गिलबिले, धनंजय शिलावटे, प्रदिप बहिरम, संतोष ढोंदे, किशोर बोडके, नितीन गांगुर्डे, ललिता शिरसाठ, अस्मिता मढवई, नाशिक तालुका पोस्टे चे पोहवा निलेश मराठे, शितल गायकवाड, अनिल गुरडनर, प्रकाश वाजे, मंगेश पानझाडे यांच्या पथकाने हा गुन्हा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.

## "सालबर्डी" चित्रपटाच्या टीमचे शिर्डीत साईबाबा दर्शन



शिर्डी : (स. गांवकरी)

आगामी काळात प्रदर्शित होणाऱ्या "सालबर्डी" या मराठी चित्रपटाच्या संपूर्ण टीमने आज शिर्डी येथे श्री साईबाबांच्या समाधीचे भावपूर्ण दर्शन घेतले. चित्रपटाच्या यशासाठी प्रार्थना करत कलाकार व निर्मात्यांनी साई चरणी नतमस्तक होत आशीर्वाद घेतले.

यावेळी श्री साईबाबा संस्थानचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे तसेच माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती. दर्शनानंतर संस्थानच्या वतीने उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे यांनी प्रसिद्ध अभिनेत्री पूजा सावंत, अभिनेते भारत गणेशपुरे, शशांक शेंडे, तसेच निर्माते दराडे आणि चित्रपटाच्या संपूर्ण टीमचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. याच प्रसंगी "सालबर्डी" चित्रपटाच्या पोस्टरचे अनावरण माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, उपमुख्य कार्यकारी अधिकारी भिमराज दराडे तसेच उपस्थित कलाकार व मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. पोस्टर अनावरणानंतर चित्रपटाबद्दल उत्सुकता वाढली असून प्रेक्षकांमध्ये चित्रपटाविषयी सकारात्मक वातावरण निर्माण झाले आहे. "सालबर्डी" हा चित्रपट कथानक, कलाकारांची दमदार फळी आणि दर्जेदार निर्मितीमुळे चर्चेत असून, आगामी काळात हा चित्रपट प्रेक्षकांच्या पसंतीस उतरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.



## 'महामानव विचार प्रबोधन यात्रा २०२६'चा भव्य जागर

श्रीगोंदा : (स. गांवकरी)

महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि संत गाडगेबाबा यांच्या संयुक्त जयंतीनिमित्त श्रीगोंदा शहरात 'महामानव विचार प्रबोधन यात्रा २०२६' अंतर्गत भव्य जाहीर व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले आहे. याबाबतची माहिती आज आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली. या वैचारिक उत्सवाची सुरुवात बुधवार, १५ एप्रिलपासून झाली असून, २३ एप्रिलपर्यंत ही प्रबोधन यात्रा शहरात विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून विचारांची पेरणी करणार आहे. संत शेख महंमद महाराज पटांगण येथे दररोज सायंकाळी ७ वाजता व्याख्यानमाला आयोजित करण्यात येत आहे. सावित्री-फातिमा सद्भावना विचारमंच, फुले-शाहू-आंबेडकर विचार मंच, महात्मा फुले समता

### दिग्गज वक्त्यांच्या व्याख्यानमालेचे आयोजन

परिषद, सत्यशोधक समाज पक्ष, बहुजन समाज पक्ष, बहुजन समता पक्ष, ऑल इंडिया पँथर सेना आदी विविध सामाजिक व राजकीय संघटनांनी या उपक्रमासाठी पुढाकार घेतला आहे. या प्रबोधन यात्रेत महाराष्ट्रातील नामवंत वक्ते आपले विचार मांडणार आहेत. बुधवार, १५ एप्रिल रोजी मा. दीपक केदार (राष्ट्रीय अध्यक्ष, ऑल इंडिया पँथर सेना) यांच्या प्रमुख उपस्थितीत व्याख्यानमालेचा उत्साहात शुभारंभ झाला. मंगळवार, २१ एप्रिल रोजी मा. अजिंक्य चांदणे (प्रदेशाध्यक्ष, डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया) हे प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित राहणार असून, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी श्री. विठ्ठलराव वाडगे (संस्थापक-अध्यक्ष, वृद्धेश्वर अर्बन मल्टीस्टेट संस्था) असतील. प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सौ. प्रतिभाताई पाचपुते (अध्यक्षा, परिक्रमा शैक्षणिक संकुल) व सौ. अनुराधा ठवाळ (माजी पंचायत समिती सदस्या) उपस्थित राहणार आहेत.

गुरुवार, २३ एप्रिल रोजी सांगता समारंभात मा. प्रा. सुकुमार कांबळे (संस्थापक अध्यक्ष, डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया) हे प्रमुख व्याख्याते असतील. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. रफिक सय्यद (प्रबोधनकार, पारनेर) राहणार असून, प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. सौ. प्रणोती जगताप व सौ. शुभांगी पोटे (माजी नगराध्यक्षा, श्रीगोंदा) उपस्थित राहणार आहेत. या प्रबोधन यात्रेच्या यशस्वीतेसाठी भारतीय बौद्ध महासभा, बहुजन समाज पार्टी, वंचित बहुजन आघाडी, संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ, प्रेरणा सेवा संघटना, ऑल इंडिया पँथर सेना, बहुजन समता पार्टी आणि महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना आदी विविध संघटनांनी सक्रिय सहभाग घेतला आहे. आज (दि. १६ एप्रिल) झालेल्या पत्रकार परिषदेत ॲड. संभाजी आप्पा बोरुडे, सुनिल ओहोळ, नंदूभाऊ ससाने, दीपकशेठ घोडके, वसंतराव सकट व संजय रणसिंग यांनी तालुक्यातील नागरिकांनी या वैचारिक उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

महापुरुषांचे विचार जनसामान्यांपर्यंत पोहोचवून समाजात सलोखा निर्माण करणे हा या प्रबोधन यात्रेचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजकांनी स्पष्ट केले.

# अनधिकृत घोषित सर्व बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करा

### आयुक्त अभिनव गोयल यांचे साहाय्यक आयुक्तांना आदेश

कल्याण : (स. गांवकरी)

कल्याण डोंबिवली पालिकेच्या १० प्रभागांच्या हद्दीत स्थानिक प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी महाराष्ट्र महापालिका अधिनियमातील कलम ४७८ अन्वये अनधिकृत घोषित केलेली,अनधिकृत असुनही उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिली नसलेली सर्व बेकायदा बांधकामे प्रभाग साहाय्यक आयुक्तांनी तात्काळ जमीनदोस्त करण्याची कार्यवाही सुरू करावी, असे आदेश कल्याण डोंबिवली पालिकेचे आयुक्त अभिनव गोयल यांनी सर्व प्रभाग साहाय्यक आयुक्तांना शनिवारी दिले. कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील फेरीवाले आणि बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याच्या विषयावर शनिवारी आयुक्त गोयल यांनी अधिकाऱ्यांच्या आढावा बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीला अतिरिक्त आयुक्त योगेश गोडसे, उपायुक्त प्रसाद बोरकर, उपायुक्त रामदास कोकरे, उपायुक्त कांचन गायकवाड आणि १० प्रभागांचे सहाय्यक आयुक्त उपस्थित होते. बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करा पालिकेच्या १० प्रभाग हद्दीत जी बेकायदा बांधकामे झाली आहेत. त्या बांधकामांविषयी



प्रभाग सहाय्यक आयुक्तांनी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील २६०,२६१, २६७ च्या प्रक्रिया पूर्ण केल्या आहेत. या कार्यवाहीत संबंधित बांधकामधारकाला नोटीस पाठवून कागदपत्रे सादर करण्याची मुभा देणे. संबंधिताने विहित वेळेत बांधकाम परवानगी, जमिनीची कागदपत्रे सादर न करणे आणि आवश्यक मुदत देऊनही संबंधित बांधकामधारकाने बांधकाम परवानगीची कागदपत्रे सादर केली नसतील तर ते बांधकाम महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील ४७८ तरतुदीनुसार प्रभाग सहाय्यक आयुक्तांनी अनधिकृत घोषित केले असेल आणि ज्या अनधिकृत बांधकामांना उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिलेला नाही, अशा सर्व बेकायदा बांधकामांवर सहाय्यक आयुक्तांनी ती बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याची कार्यवाही तात्काळ सुरू करावी, असे आदेश आयुक्तांनी बैठकीत दिले. या आदेशामुळे सहाय्यक आयुक्तांना आपल्या अभिलेखात आतापर्यंत अनधिकृत घोषित केलेली सर्व बेकायदा बांधकामे जमीनदोस्त करण्याची कार्यवाही पूर्ण करावी लागणार आहे. आयुक्तांच्या या आदेशामुळे भूमाफियांमध्ये खळबळ उडाली आहे. गेल्या वर्षभराच्या कालावधीत पालिका प्रशासनाने बेकायदा बांधकामे विषयावर कधीच आक्रमक किंवा चर्चेला हा विषय घेतला नव्हता. प्रथमच प्रशासनाने या विषयावर रोखठोक भूमिका घेतल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले आहे.

कल्याण डोंबिवली पालिका हद्दीतील १० प्रभाग हद्दीतील अनधिकृत बांधकामांसंदर्भात अनेक नागरिकांनी आयुक्त, अतिरिक्त आयुक्त,अतिक्रमण नियंत्रण उपायुक्त यांच्या स्तरावर तक्रारी केल्या आहेत. या सर्व तक्रारी संबंधित प्रभागांमध्ये कार्यवाहीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक डॉ. विश्वासराव आनंदराव आरोटे यांनी सोनेरी छत्रपती प्रिंटर्स, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक समर्थ गांवकरी कार्यालय, भिंगारे गोडावूनजवळ, अकोले, ता. अकोले, जि. अहमदनगर – ४२२६०१ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. This newspaper is printed by owner, printer, publisher, editor Vishwasrao Anandrao Arote at Soneri Chhatrapati Printers, Near Bhingare Godown, Akole, Tq. Akole, Dist. Ahmednagar - 422601.
पुणे निवासी संपादक : प्रतिक गंगणे, मुंबई विभागीय संपादक : दशरथ चव्हाण, व्यवस्थापक : संजय फुलसुंदर कार्यकारी संपादक : नवनाथ जाधव, ॲड. रचना भालके (हायकोर्ट), ठाणे
पुणे विभागीय कार्यालय : फ्लॅट नं. ४०६, व्यंकटेश विश्व, अभिरूची परिसर समोर, पारे कंपनी रोड, नऱ्हे, पुणे – ४११०४१ / ठाणे विभागीय कार्यालय : A-1, भाग्यश्री छाया, बेसमेंट, आवाज रेडिओ जवळ, डेअरी कॉटेज, इदुलजी रोड, चाराई, ठाणे (वे.)